# ओएनजीसी (डब्ल्यूओयू) कर्मचारी संघटना

( एकमेव मान्यताप्राप्त युनियन )

आपणांस सर्वांनाच माहीत आहे कि, सन २००४ मध्ये R&P संदर्भात तत्कालीन मान्यताप्राप्त युनियनने जो MOU केला होता, त्यामुळे सन २००४ नंतर ओएनजीसीमध्ये भरती झालेल्या प्रत्येक कामगाराचे अतोनात नुकसान झालेले आहे. यातून मार्ग काढण्याकरीता **'कर्मचारी संघटना'** गेली अनेक वर्षे सातत्याने प्रयत्न करीत होती. आणि प्रामाणिकपणे करीत असलेल्या प्रयत्नांना यश येवून सदर MOU त सुधारणा करण्याकरीता मॅनेजमेंट राजी झालेली असून त्याकरीता सर्व मान्यताप्राप्त सरचिटणीसांची एक कमिटी बनविण्यात आलेली आहे व या कमिटीची पहिली बैठक दिनांक २२/०१/२०१५ रोजी वडोदरा येथे होवून त्यामध्ये सकारात्मक चर्चा झालेली आहे. सदर २००४ चा MOU, त सुधारणा करण्याकरीता नेमण्यात आलेली कमिटी व त्या संदर्भात नुकतीच झालेली बैठक याबाबत सविस्तर माहीती मिळविण्याकरीता अनेक कर्मचाऱ्यांनी आग्रह केल्यामुळे आम्ही आपणांस विस्तृतपणे पुढीलप्रमाणे नमूद करीत आहोत.

मित्रहो सन २००४ पूर्वी डिप्लोमा झालेले उमेदवार हे ज्युनियर इंजिनीयर या पदावर भरती होवून चार वर्षातच (E-O) अधिकारी या पदावर पदोन्नती होत होती. या MOU मुळे या सर्व डिप्लोमा धारक कर्मचाऱ्यांना E-O बनण्याकरिता ४ वर्षाऐवजी १८ वर्षे एवढा प्रदीर्घ कालावधी लागणार आहे. तसेच सन २००४ पूर्वी JAT या पदावर नियुक्त झालेल्या कामगारांना ३ वर्षात AT या पदावर पदोन्नती होत होती, त्याकरीता आता ६ वर्षे एवढा कालावधी लागणार आहे. हा करार **पेट्रोलियम एम्प्लॉईज युनीयनने** का केला याबाबत त्यांच्याकडे आज कोणतेही ठोस उत्तर वा स्पष्टीकरण नाही. नुकसान झालेल्या अनेक संतप्त कर्मचाऱ्यांनी या तथाकथीत युनियनच्या पदाधिकाऱ्यांना या MOU बद्दल जाब विचारला असता, नविन कामगार भरती होत नव्हती म्हणून आम्ही हा करार केला. तसेच स्थानिक लोकांना नविन भरतीत प्राधान्य मिळावे, म्हणून आम्ही हा करार केला अश्या प्रकारची सारवासारव आज हि नेतेमंडळी करीत आहे. परंतु हे पूर्णपणे खोटं आहे. आज प्रत्येक कामगारांना सत्य काय आहे, हे समजल्यामुळे हि नेतेमंडळी आज हतबल झालेली आहेत. नविन नोकरभरती व सदर MOU याचा काही देखील संबंध नाही, कारण २००४ चा हा MOU झाल्यानंतरही तब्बल ६ वर्षे म्हणजेच सन २०१० पर्यत विशेष भरती झालेलीच नाही. मोठया प्रमाणावर जी भरती झालेली आहे ती सन २०१० मध्ये कर्मचारी संघटना सत्तेमध्ये आल्यानंतरच झालेली आहे हे आज सर्वानाच ज्ञात आहे.

मित्रहो, आपण ओएनजीसीतील जुन्या जाणत्या कामगारांकडून माहीती घेतल्यास आपणांस निश्चितपणे कळेल कि सन १९८१ पर्यत ओएनजीसी, मुंबई मध्ये फक्त मुठभरच स्थानिक कर्मचारी असून, बहूसंख्य कर्मचारी हे परप्रांतीय होते. त्यावेळी **मा.बाळासाहेब ठाकरे** यांच्या आशीर्वादाने ओएनजीसीत स्थानीय लोकाधीकार समितीची स्थापना करण्यात आली. मुंबईतील इतर बहूराष्ट्रीय कंपन्या, बँका यांजबरोबर ओएनजीसीमध्ये देखील स्थानिक भरतीसाठी आंदोलने झाली व खऱ्या अर्थाने १९८२ नंतर हजारो स्थानिक कर्मचाऱ्यांची ओएनजीसीत भरती झाली. आज **स्थानीय लोकाधिकार समिती** व **कर्मचारी संघटने**वर चिखलफेक करणारी ही मुठभर मंडळी देखील याच स्थानीय लोकाधिकार समितीच्या माध्यमातुन ओएनजीसीत आलेली आहेत, याचा त्यांना आपल्या वैयक्तीक स्वार्थामुळे आज विसर पडलेला आहे. यापूर्वी झालेली सलग ऐतीहासीक दोन पे-रिव्हीजन्स व आजपर्यत कामगारांना ज्या सोईसवलती मिळल्या आहेत त्या मिळविण्यात कर्मचारी संघटनेचाच सिंहाचा वाटा आहे. कर्मचारी संघटनेने या संदर्भात मॅनेजमेंटला वेळोवेळी लिहिलेली शेकडो पत्रे, कर्मचारी संघटनेच्या वेबसाईटवर आज देखील त्याची साक्ष देत आहेत.

आज २००४ चा MOU त सुधारणा करण्याकरीता जी कमिटी बनविण्यात आलेली आहे, त्याकरीता कर्मचारी संघटना गेली अनेक वर्षे सातत्याने पत्रव्यवहार करुन मॅनेजमेंटकडे पाठपूरावा करीत आहे. या MOU विरोधात कर्मचारी संघटनेने Labour commissioner कडे देखील तक्रार करुन मॅनेजमेंटवर दबाव आणण्याचा प्रयत्न केलेला आहे, हे सर्व प्रयत्न करित असताना नुकत्याच झालेल्या JCM मध्ये इतर महत्वाच्या विषयाबरोबर सदर MOU च्या विषयाला प्राधान्य देवून मॅनेजमेंटला चर्चा करण्यास भाग पाडले. या सर्व घटनांमुळे मॅनेजमेंट सदर MOU त सुधारणा करण्यासाठी कमिटी बनविण्यास राजी झाली. आज कमिटी बनल्यामुळे निश्चितपणे आपण अर्धी लढाई जिंकलो आहोत. आणि याचा जास्तीत जास्त फायदा हा संबंधीत कर्मचाऱ्यांना मिळवून देण्याचा कर्मचारी संघटना प्रयत्न करणार आहे. मात्र यासाठी आपली भक्कम एकजुट व पाठिब्यांची कर्मचारी संघटनेला अत्यंत गरज आहे. कारण एकदा झालेला MOU पुन्हा ओपन करणे हे अशक्य आहे, याची पूर्णपणे खात्री असल्यामुळे व ११ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर हा MOU होईल याची स्वप्नातदेखील कल्पना नसल्यामुळे आज हा MOU ओपन झालेला आहे ही बाब कामगारांचे नुकसान करणाऱ्या मंडळींच्या अत्यंत जिव्हारी लागलेली आहे आणि म्हणुनच समोरील युनियन या MOU त सुधारणा होवू नये यासाठी आतून जोरदार प्रयत्न करित आहे. तसेच अफवा पसरवून यापूढे आपणांस विचलीत करण्याचा प्रयत्न करणार आहेत. आम्ही आपणांस ठामपणे आश्वासीत करीत आहोत कि, या कमिटी मार्फत कामगारांचा निश्चितपणे फायदा होणार असून, अफवा पसरवून आपल्या या प्रयत्नात विघ्न आणण्याऱ्यांना आपणच सडेतोड उत्तर देवून गप्प बसविण्याची गरज आहे.

दिनांक २२/०१/२०१५ रोजी सदर कमिटीची पहिली मिटींग हि वडोदरा येथे अत्यंत सकारात्मक चर्चेत पार पडली. या मिटींमध्ये कर्मचारी संघटनेने सर्वप्रथम सन २००४ चा दूर्दैवी करार संपूर्णपणे रद्द करण्याची मागणी केली, परंतु मॅनेजमेंटने हा पूर्ण करार रद्द करण्यास असमर्थता दर्शवली. कारण एखाद्या विषयावर जो MOU बनतो, त्या विषयावर अनेक महिने मॅनेजमेंट व मान्यताप्राप्त युनियनच्या अनेक बैठका होवून दोघांचे एकमत झाल्यानंतर MOU बनतो आणि एवढया प्रदीर्घ चर्चेने व दीर्घ कालावधीने झालेले MOU च रद्द केले तर भविष्यात होणाऱ्या कोणत्याही MOU ना काहीच अर्थ रहाणार नाही आणि म्हणूनच हि जोखीम मॅनेजमेंट घेण्यास राजी झाली नाही. आज प्रत्येक कर्मचाऱ्याला व कर्मचारी संघटनेला देखील हा पूर्ण करार रद्द होवू शकत नाही याची जाणीव असताना देखील पहिल्याच मिटींग मध्ये मुळावरच घाव घालण्याचा उद्देशाने कर्मचारी संघटनेने अशी मागणी केलेली होती.

मॅनेजमेंटने दिलेल्या माहितीनुसार ओएनजीसीत एकुण २५०० पेक्षा अधिक कामगार या MOU शी संबंधीत असुन त्यांचा प्रमोशनचा कालावधी काही प्रमाणात कमी करण्याबाबत एकूण अभ्यास करण्याविषयी मॅनेजमेंटतर्फे कर्मचारी संघटनेस आश्वासन देण्यात आले. यापूढील होणाऱ्या एकूण मिटींग तसेच यासंबंधीचा एकूण वर्कआऊट किती निश्चित कालावधीत पूर्ण होणार याबाबतीत कर्मचारी संघटनेने मॅनेजमेंटकडे आग्रह धरला. याचे कारण म्हणजे मान्यताप्राप्त युनियन एखादी वाढीव सवलतीची मॅनेजमेंट कडे मागणी करते तेव्हा एकतर मॅनेजमेंट साफ नकार देते किंवा ती मागणी तत्वतः मान्य करते. परंतु तत्वतः मान्य केलेली मागणी पूर्ण करण्यासाठी मॅनेजमेंटला कोणतीही घाई किंवा स्वारस्य नसल्यामुळे तसेच मॅनेजमेंट कडून तयार झालेला प्रस्ताव हा Board of Director तसेच EC यांचे कडून मंजुर होऊन येण्यास बराच मोठा कालावधी लागत असल्यामुळे सदर सवलत कामगारांच्या पदरी पडण्यास दिड-दोन वर्षापेक्षा देखील अधिक कालावधी निघून जातो आणि म्हणूनच निश्चित कालावधीसाठी कर्मचारी संघटनेने दबाव टाकल्यामुळे येत्या ऑगस्टपर्यंत एकंदरीत चित्र स्पष्ट करण्याबाबत मॅनेजमेंटकडून आश्वासन मिळविण्यात कर्मचारी संघटना यशस्वी झालेली आहे हि बाब आपल्या सर्वांसाठीच अत्यंत महत्वाची आहे.

मित्रहो! आज कर्मचारी संघटना मान्यताप्राप्त असून सत्तेमध्ये असल्यामुळेच हे सारे शक्य झालेले आहे याची प्रत्येक कामगाराला जाणीव आहे आणि एखादा पूर्वी झालेला MOU, ११ वर्षानंतर Re-open करुन कामगारांना न्याय मिळवून देण्यात 'कर्मचारी संघटना' यशस्वी झाल्यास कामगार क्षेत्रात हा एक इतिहास होणार आहे आणि हा इतिहास आपल्या सर्वांच्या सहकार्याने घडणार यात तिळमात्र शंका नाही.

कामगारांची भक्कम एकजुट हिच खरी युनियनची ताकद असते. हि ताकद कामगारांचे नुकसान करणाऱ्या युनियनच्या मागे लावावी कि, कामगारांचे भविष्य शाश्वत करणाऱ्या, कामगारांना आर्थिक स्थैर्य देणाऱ्या युनियनच्या मागे लावावी हे प्रत्येक कामगाराने स्वतःच ठरविले पाहीजे. ओएनजीसीत भरतीच्या वेळी पहिल्याच दिवशी भांबावलेल्या अवस्थेत असणाऱ्या नविन कामगाराकडून आपल्या युनियनचा फॉर्म भरुन घेणे व कागदपत्रांची जुळवा-जुळव करुन मदत केल्याचा बहाणा करणे एवढीच युनियनची कामे मर्यादीत नसतात हे आज ओएनजीसीत नव्याने रुजु झालेल्या कामगारांना देखील व्यवस्थीत कळले आहे. सन २०१० मध्ये गुप्त मतदानाने झालेल्या निवडणूकीत कर्मचारी संघटना प्रचंड मतानी जिंकली तो विजय येथील जुन्या जाणत्या कर्मचाऱ्यांनी तसेच येथील डायरेक्ट एम्प्लॉइजनी मिळवून दिलेला आहे. मात्र २०१३ च्या निवडणूकीत ७०० पेक्षा अधिक मतदार ओएनजीसीत नव्याने भरती झालेले कामगार होते व यातील बहूसंख्य कामगारांकडून समोरील युनियनने फसगत करुन आपल्या युनियनच्या सभासदत्वाचे फॉर्म भरुन घेतले होते आणि याच जोरावर आपण प्रचंड मतांनी जिंकणार अशी या मंडळीना जबरदस्त खात्री होती. परंतु ओएनजीसीत आल्यानंतर या ७०० पैकी बहूसंख्य कामगारांना येथील खरी परिस्थिती समजल्यामुळे, त्यांनी योग्य त्या ठिकाणी मतदान केल्यामुळे कर्मचारी संघटना सलग दुसऱ्यांदा प्रचंड मतांनी विजयी झालेली आहे. आणि हा विजय येथील जुन्या-जाणत्या कामगारांचा कर्मचारी संघटनेवर असलेला अतुट विश्वास व अढळ निष्ठेचा आहे. त्याचबरोबर ओएनजीसीत नव्याने रुजु झालेल्या कामगारांचा येथील एकंदरीत परिस्थितीचे अचुक अवलोकन करुन योग्य तो निर्णय घेण्याचा प्रगल्भ विचार क्षमतेचा विजय आहे. आणि या मिळालेल्या मान्यताप्राप्तीच्या ताकदीवर २००४ च्या MOU मध्ये सुधारणा घडविण्याबरोबरच, सुपरवायझरी कॅटेगरीमधील कामगारांप्रमाणेच तृतीय व चतुर्थ क्षेणीतील कामगारांना लॅपटॉप, डेटा कार्ड, कार लोन व कार CMRA इ. अनेक सवलतीचा पूर्ण ताकतीनिशी पाठपूरावा करीत आहे. यापुर्वी देखील अनेक अवघड सवलती कर्मचाऱ्यांना मिळवून देण्यात कर्मचारी संघटना यशस्वी झालेली असून, यापुढे देखील आपल्या सर्वाच्या सहकार्याने अनेक सोईसवलती कामगारांना मिळवून देण्यास कर्मचारी संघटना आपल्याशी वचनबद्ध आहे.

धन्यवाद !

**कामगार एकता झिंदाबाद !**
**कर्मचारी संघटना झिंदाबाद !!**

**अध्यक्ष : प्रकाश दळवी** **सरचिटणीस : प्रदीप मयेकर**